# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ३
## सभावृत्तांत

दिनांक :- १२/०६/२०१८ वेळ :- दुपारी १२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक १२/०६/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
३. मा.मोरेश्वर महादु भोंडवे
४. मा.नामदेव जनार्दन ढाके
५. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६. मा.सुरेश शिवाजी भोईर
७. मा.राजेंद्र तानाजी गावडे
८. मा.निता विलास पाडाळे
९. मा.उषा दिलीप काळे
१०. मा.विभीषण चौधरी, स्वीकृत सदस्य
११. मा.देवीदास पाटील, स्वीकृत सदस्य
१२. मा.विठ्ठल बबन भोईर , स्वीकृत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.शेख ए एस, प्रभारी कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.डॉ.ए.एम.दगडे, पशुवैदयकिय अधिकारी, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग,श्री.आर.एम.इंगळे, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.सुनिल अहिरे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्षक ब क्षेत्रीय कार्यालय, श्री.राजु कोतवाल, क्रिडा पर्यवेक्ष क्रिडा विभाग, श्री.डी.डी.फाटक, कनिष्ठ अभियंता, श्री.आर.पी.कुलकर्णी, नगररचना व विकास विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवड अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक २, दिनांक ८/५/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.सन्मा.सदस्य व मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक ६ मौजे - रहाटणी (काळेवाडी) येथील विकास योजनेव्यतिरिक्त मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित केलेला रस्ता रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.**

विषय क्रमांक ७ वापरात नसलेले शौचालय व मुतारी पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणाताई शेखर चिंचवडे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ६ विषय क्र. १

दिनांक १२/०६/२०१८ विभाग - नगररचना व विकास विभाग

सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर अनुमोदक: मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ यांचा दि.१५/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे किवळे, माळवालेनगर स.नं.७५/२ब/१ याठिकाणी १८.०० मीटर रस्त्याच्या पुर्वेला रोडपासून अंदाजे १०० मीटरवर ४० ते ५० कुटूंब राहत असून, काही स्थानिक मंडळींनी त्यांचा येणे जाण्यासाठी असलेला रस्ता बंद करुन सदर गरीब कुटूंबांना लॅण्ड लॉक केले असून, सदर कुटूंबासाठी सर्व्हे नं.७५/१३अ मधून मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी पुढील मिळकतीमधून १) कमाल गुलाब गाडे २) किसन बाळा तरस ३) लक्ष्मण तुकाराम तरस ४) जयवंत किसनराव नेटके यांच्या मिळकतीमधून कमीत कमी ६.०० मीटर रुंदीचा नियम २०५ नुसार रस्ता करुन दयावा व शेतक-यांना त्यांचा कायदेशीर योग्य तो मोबदला देऊन वरील प्रश्न सोडविण्याचा प्रस्ताव तहकुब करुन नगररचना विभागाने समक्ष पहाणी करुन अभिप्राय आल्यावर पुढील मा.प्रभाग समितीपुढे ठेवणेत यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७ विषय क्र. २

दिनांक १२/०६/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.निता विलास पाडाळे अनुमोदक: मा.उषा काळे

संदर्भ :- मा. निता विलास पाडाळे यांचा दि.१४/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २२ कोकणेनगर काळेवाडी मधील एका कॉलनीचे पुर्वीचे नांव पंचरत्न कॉलनी असे होते पण आता हया कॉलनीचे नांव बदलून नवीन नांव शिवरत्न कॉलनी असे बदलण्यात आले आहें व कॉलनीतील नागरीकांच्या विदयुत बिल, आधार कार्डवर शिवरत्न कॉलनी असा उल्लेख आहे त्यामुळे बहुतांश नागरीकांच्या पत्रव्यवहारात असुविधा निर्माण होत आहे. हया कॉलनीचे नांव बदलण्यात सर्व नागरीकांचे सर्व समती आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८ विषय क्र. ३

दिनांक १२/०६/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.उषा दिलीप काळे अनुमोदक: मा.निता विलास पाडाळे

संदर्भ :- मा. उषा दिलीप काळे यांचा प्रस्ताव

८८ मधील ज्योतिबा उदयानासमोरील बस स्टॉपला कै.रघुनाथ भाऊ काळे असे नामकरण करणेकामीचया प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. ९ विषय क्र. ४

दिनांक १२/०६/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.उषा दिलीप काळे अनुमोदक: मा. निता विलास पाडाळे

संदर्भ :- मा. उषा दिलीप काळे यांचा प्रस्ताव

आदर्शनगर चौक ते पवनानगर मंजूर डीपी रस्त्याला कै.इंदुबाई रघुनाथ काळे असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १० विषय क्र. ५

दिनांक १२/०६/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.संगिता राजेंद्र भोंडवे अनुमोदक: मा.नामदेव जनार्दन ढाके,

संदर्भ :- मा. बाळासाहेब नामदेव ओव्हाळ यांचा दि.६/६/२०१८ रोजीचा प्रस्ताव

स.नं.१७/१ साईनगर, मामुर्डी हे रहदारीचे ठिकाण असून, त्या ठिकाणी अनेक कुटूंब राहतात. तरी सर्व नागरीकांच्या विनंतीचा विचार करीता चौकास चिंतामणी राऊत चौक असे नांव स्थानिक मंडळींनी सुचविले आहे. तरी सदर चौकास चिंतामणी राऊत चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ११ विषय क्र. ६

दिनांक १२/०६/२०१८ विभाग - नगररचना व विकास विभाग

सुचक : मा.निता विलास पाडाळे अनुमोदक: मा.उषा दिलीप काळे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दि.११/६/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे-रहाटणी (काळेवाडी) येथील विकास योजनेव्यतिरिक्त मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ४.५० मी., ६.०० मी., ७.५० मी., व ९.०० मी. रुंद रस्ते मा.आयुक्त यांचे आदेश क्र.नरवि/कावि/रहाटणी/१०७/१०, दिनांक २२/२/२०१२, अन्नये घोषित करणेत आलेला आहे. सदर रस्त्यामध्ये सर्व्हे नं.७९ मधील ४५.०० मी. रस्त्यापासून काळेवाडी

गावठाणातील ९.०० मी. डीपी रस्त्यापर्यंतच्या ७.५० मी. रुंद रस्त्याचा अंतर्भाव आहे. सदरचा घोषित ७.५० मी. रस्ता ४५.०० मी.रस्त्यापासून परशुराम नढे यांचे घरासमोर पर्यंत उपलब्ध आहे. तेथुन पुढे ९.०० मी.डीपी रस्त्यापर्यंत त्यामध्ये बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे सदरचा ७.५० मी. घोषित रस्ता ४५.०० मी. डी.पी. रस्त्यापासून परशुराम नढे यांचे घरासमोरपर्यंत कायम ठेवण्यात यावा व तेथून पुढे ९.०० मी.डी.पी. रस्त्यापर्यंतचा भाग रदद करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १२
दिनांक १२/०६/२०१८
सुचक : मा.नामदेव जनार्दन ढाके

विषय क्र. ७
विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.करुणाताई चिंचवडे

संदर्भ :- मा.करुणाताई शेखर चिंचवडे यांचा दि.०८/६/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १७ मध्ये पुढे नमुद केलेल्या ठिकाणांची शौचालय व मुतारी १) पांढारकरचा नाल्यावरचा २) पांढारकरचाळ नाल्यापलिकडचा ३) बिजलीनगर एमआयडीसी शेजारी मुतारी ४) तुकारामनगर वाल्हेकरवाडी शौचालय पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.राजेंद्र तानाजी गावडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/902/२०१८.
दिनांक :29/ 6 /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना